1163

1163
MAHĀDEV, *Śāhīr*
Rāṣṭroddhāra kāvyasumanamālā puṣpa 1 leṃ.
Tārāpura (Thane dist.) (Nagpur printed): Mahādeva Gopāḷa Borasa, 1853 [1931].
16 p. 18 cm.
Part 1 of a collection of nationalistic songs. Perhaps the author was none other than the publisher?
PIB 162/10A-B

12.10.31.
PIB 162/108

राष्ट्रोद्धार काव्यसुमनमाला

पुष्प १ लें.



रचणार

काव्य-केसरी **महादेव शाहीर.**

किंमत ४ आणे] [शके १८५३

PIB 162/108

जयभवानी] ॥ ॐ ॥ [श्री भारतमातेकी जय

॥ श्री गुरुदेव दत्त प्रसन्न ॥

MAHADEV Sahir

(भाग १ ला.)

॥ ईशस्तवन ॥

पद १ (चाल — मरण गणुनि)

हर हर चंद्रमौळी । वेळ कठिण आज आली । यश द्यावें महात्म्यांना
लढती स्वातंत्र्यरणीं । वय हें तुम्हांसी गेलें ना । हिंद आज उद्धरण्या । साह्य करी
यावेळीं ॥ १ ॥ हरहर चंद्रमौळी ॥ करपुर धवलांगारा । रक्षी प्रभु जवाहिरा ।
शोकाकुल असतांना लढती ते राष्ट्ररणीं ॥२॥ हरहर चंद्रमौळी ॥ राष्ट्रावर आला
घाला । मोतीलाल आज गेला । राष्ट्र-अधिपती मावळला ॥ ३ ॥ हरहर चंद्रमौळी ।
भारतावरी कोप केला । बाळगंगाधर तोही गेला । जरी असता यावेळीं असुरी
सत्ता पळविण्याला ॥ ४ ॥ हरहर चंद्रमौळी ॥ सुवर्णभूमी ब्रिटिशें लुटिली ।
परवशता बेडी पडली । असुरी सत्ता नष्ट करी धांव धांव त्रिपुरारी ॥ ५ ॥
हरहर चंद्रमौळी ॥ तो हे जग निर्मियलें । ज्ञान देश त्यांचा दिधलें । कृपादृष्टी ठेवीं
आतां स्वयंभु प्रगटे यावेळीं ॥ ६ ॥ विजय देई हिंदरणीं हरहर चंद्रमौळी ॥

॥ महात्म्याचें स्तवन ॥

पद २. (चाल—पावना वामना या मना)

मोहना मोहना मोहना । वाजली स्वातंत्र्य वेणु तूं रणांगणा ॥
स्वातंत्र्याचा वेणुनाद हा । हरित द्वैत कामना ॥ १ ॥ मोहना० ॥
हिंद दिवाळा कृपासागरा । हरिलें त्वा भेददैन्य आजना ॥
कष्टवुनि समरीं तुम्हा । पुण्यवंत देह ना ॥ २ ॥ मोहना० ॥

सुमनहार हा अर्पिती विर तुज । करुनिया स्वातंत्र्यगर्जना ॥
विजयरथीं बैसुनिया । आश्रमीं आलास नां ॥ ३ ॥ मोहना० ॥
शाहिर महादेव । प्रेमानंदें वर्णितसे गुणवर्णना । दे तव भजनीं निरंतर
वासना ॥ ४ ॥ मोहना० ॥

॥ आर्या ॥

देशोन्नति साधाया ऐक्याचा पाहिजेच ओलावा ॥
साह्य परस्पर करुनि स्वदेश उद्यम वृद्धीस हात घालावा ॥

राष्ट्रनृपाळ जवाहिरलालजींची रणगर्जना

पद ३. (चाल—आनंदाचा कंद हरि हा)

सननननननन सनया वाजती । डंका नौबती फडफडल्या ।
राष्ट्रपती जवाहिरलाल कीं । समरीं नमविती गोऱ्यांना ॥ १ ॥ सननन० ॥
धैर्याचा सागर जवाहिर । स्वातंत्र्याचा भानु खरा ।
न्यायाचा जो धर्म खरोखर । देशाचा कीं नृपती बरा ॥ २ ॥ सननन० ॥
शौर्याचा जो समरि-धनुर्धर । शौर्य गाजवी हिंदरगा ।
स्वातंत्र्यातच लढुनि रणीं तो । विजयी आज या जाहला ॥ ३ ॥ सननन० ॥
धर्माचा जो बळिराज खरोखर । ऐश्वर्याचा कीं पुतळा ।
अखिल जनांस्तव लढुनि समरीं । पळवी गोऱ्या सेनेला ॥ ४ ॥ सननन० ॥
स्वातंत्र्याची अखिल जगतीं । रणगर्जना करुनिया ।
भारताच्या समर भूमिवर । तिरंगी झेंडा फडकविला ॥ ५ ॥ सननन० ॥
सकल जनांना शुद्ध खादिचा । उपदेश अनि देण्याला ।
शुद्ध खादीनें सकल ही ज्यानीं । देह कीं आपुला सजविला ॥ ६ ॥ सननन० ॥
स्वदेश माझा मी देशाचा । ध्यास निशिदिनीं हा धरिला ।
सुवर्णभूमिच्या सरहद्दीवर । झेंडा फडकवितो आपुला ॥ ७ ॥ सननन०
आजुनही म्हणती गुलामगिरिचा । नाद जनहो तुम्ही सोडा ।
देशाखातर तनु झिजवोनी । दैन्य आपुलें आज हरा ॥ ८ ॥ सननन० ॥
काव्य केसरी प्रेमें बोले । आवरा राष्ट्रपती बोला ।
स्वसमरीं या लढुनी मिळवा । हिंद देश कीं आपुला ॥ ९ ॥ सननन० ॥

पद ४ (चाल—तपोवनी आज बसला मोहनाभिराम)

स्वातंत्र्यवीर । बनला मोहनाभिराम । बनला मोहनाभिराम ।
धरुनि स्कंधीं राष्ट्र-ध्वज हा । देतसे प्रणाम सकलां ॥ मोहना० ॥ १ ॥ स्वा० ॥
शांति ही समशेर ज्याची बहिष्कार ढाल ;
कानुमंग हे करुनिया ॥ अमर करी नाम जगतीं मोहनाभिराम ॥ २ ॥ स्वा० ॥
खादि वापरा म्हणुनिया । बोधितो जनांसी निशिदिनीं ।
फिरवोनी गरगर चरखा । करितसे सकाम प्रतिदिनीं मोहनाभिराम ॥ ३ ॥ स्वा० ॥
रात्रंदिन ध्यास ज्याचा । प्रिय स्वदेश मिळविण्याचा ।
देशदैन्य जो हरावया । प्रगटला कीं आज आपुला । मोहनाभिराम ॥ ४ ॥ स्वा० ॥
शाहिर महादेव म्हणतसे । सुदिन आले स्वातंत्र्याचे ।
आशा पूर्ण तो करिल या । चंद्रमौळी सांब । बनला मोहनाभिराम ॥ ५ ॥ स्वा० ॥

॥ श्लोक ॥

जनीं मोहनांनी श्रम फार केले । करुनिया मार्ग शांतिचा विजयी जाहले ।
जनीं मोहनांनीं फिरंगी नमावेले । तिरंगा निशाणा समरीं सजविले ॥ जनीं० ॥

पद ५ (चाल—मेरे मौला बुला लो)

आपुल्या मातृभुमिला । स्वाभिमान धरा । आपुल्या सुवर्ण भूमिला ॥ स्वा० ॥
जुलमी सत्ता पळवुनिया । शांति हृदयीं अज धरा ।
परदेशी कपडे त्यागुनिया । खादी तुम्ही ही वापरा । ऐसी सुधारणा
भारतांत करा ॥ १ ॥
खेद कोल्हापूर ग्वालेर आणि हो सयाजिना । आतां हे नृप इंग्लीशांना माना वांकवितात ना । ऐशा राजांना कांहि उपदेश करा ॥ २ ॥ आपुल्या० ॥
[illegible] ऑफ पदवी कशाला । आज हो निंबाळकरा । रावबहादुर पदव्या नको ह्या
आमच्या हिंद जनतेला । याही पदव्यांनी केला आपला मातेरा ॥ ३ ॥ आपुल्या० ॥
राष्ट्रांत कोठें चालती जुगार । पकडली पोलीसनं ।
आता जुगारी हा कोण हो ठरला ॥ ४ ॥ आपुल्या० ॥
देशकार्यी लढती महात्मा । जवाहीर नेहरुच ना ।
देशकार्यी देह अर्पुनी । दैन्य आपुले घालविण्या ।

त्यांचा सद्बोध कांहिं हृदयीं स्मरा ॥ ५ ॥ आपुल्या० ॥
शाहिर महादेव बोलियला मंत्र आपुला हा बरा ।
परदेशी कपडे त्यागूनि या खादी तुम्ही वापरा ।
ऐसी आज्ञा केली महात्म्यां वीरा ॥ ६ ॥ आपुल्या० ॥

स्वाभिमानी वीर

पद ८. (चाल—सुखाचा शोध लावाया.)

दऱ्यांखोऱ्यांतला आला । शाहिर महादेव दरबारा ।
भारतांच्या महालक्ष्मी । तुम्ही घ्या शाहिरी मुजरा ॥ १ ॥ दऱ्यां० ॥
जिजाऊंचा बाळ तान्हा । श्री शिवबा शूर वीर झाला ।
रक्षुनि हिंदु धर्माला । मराठ्याचा विजय केला ॥ दऱ्यां० ॥
वीर तानाजी या झाले नेताजी शूरवीर बनले ।
अमर करुनि जगति कीर्ती । सुयश संग्रामीं मिळविलें ॥ ३ ॥ दऱ्यां० ॥
सुर्याजी शेलार मामांनीं । रणक्षेत्र अतुल गर्जविलें ।
घेवोनि बदला तानाजींचा । समरीं उदयभानूसि या वधिलें ॥४॥ दऱ्यां०॥
इमानी बिर मुरारबाजीना । रणधीर नांव ते सजले ।
शिरावांचुनी धड लढवोनी । शत्रुंना बेजार केलें ॥ ५ ॥ दऱ्यां० ॥
हिराजी गुप्त वीर म्हणुनि । ऐनवेळीं साह्य त्यांनीं केलें ।
जाउनि यवनांच्या दरबारा । श्री शिवबा मुक्त हो केलें ॥ ६ ॥ दऱ्यां० ॥
स्वाभिमानी जगदेवमान्याची । विजापुरीं नांव मिळविलें ।
म्हणाले श्री शिवबा हो त्यांना । स्वदेशा साह्य त्वां द्यावें ॥ ७ ॥ दऱ्यां० ॥
म्हणाले जगदेव शिवबांना । वचन माझें प्रभुनें ऐकावें ।
विजापुरीं स्वारी नाहीं करणार । तर म्यां स्वदेश हित वारिलें ॥ ८ ॥ दऱ्यां ०
बाजीवीर सांवळ्या तांडेलनीं । शौर्य हो अतुल रणीं केलें ।
सागर तिरीं हरवुनि शत्रूंना । श्री शिवबा विजयी हो केलें ॥ ९ ॥ दऱ्यां० ॥
ऐकता शब्द शिवबांचे । स्फुरण त्या सांवळ्या चढलें ।
म्हणे मम देश भक्तीचें । सार्थक या आज हो झालें ॥ १० ॥ दऱ्यां० ॥
देशभक्ती करा म्हणुनि । प्रसिद्ध इतिहास हा बोले ।
स्वराज्याचा श्रीगणेशा । श्री शिवबा करुनिया गेले ॥ ११ ॥ दऱ्यां० ॥

एकुनि शौर्य शिवबांचें । स्फुरें आज महात्म्यांसी चढलें ।
महादेवांनी आपुलें । शिवचरण प्रेमें पुजियलें ॥ १२ ॥ द्यां० ॥

भाग पहिला समाप्त.

(भाग २ रा.)

पद ७ (चाल —नव हिंद राष्ट्र स्फूर्त्या प्रणामा घे या)

हे जगद्वंद्य लोकमान्या प्रणामा घे या । स्वातंत्र्याची सिंहगर्जना । प्रथम तूं या भारतीं केलीस ना ॥ १ ॥ प्रणामा घे या । लढतां समरीं तूं घर घर कांपे ब्रिटिश तुजला या ॥ म्हणे हा पंचानन कधीं तरी नमविल हिंद रणा मजला ग्रासिल हिंद रणा ॥ २ ॥ प्रणामा घे या ॥ स्वातंत्र्यगर्जना करण्या जासी प्रथम युरोपाला । युरोपांतील जन पाहुनि म्हणती हा हिंद हिरा आला । नमन करुं यांना । फिरंगी नृप तो पाहुनी लाजला । तुझ्या त्या प्रखर तेजाला । तुझ्या शौर्याला ॥ ३ ॥ प्रणामा घे या ॥ लढतां समरीं धडाक्याने घेतला काळ ॥ जातां जातां उपदेशिलें त्वां पवित्र महात्म्यांना । मिळवि स्वातंत्र्या ॥ ४ ॥ हे जगद्वंद्य० ॥ तव प्रसादें स्फुरुनि महात्मा आज समराला । कायदे भंग ते करुनि त्यांनीं उपदेश जना दिधला । [illegible] तुझ्या । तथापि महात्मा तिरंगी झेंडा समराला ॥ ५ ॥ प्रणामा घे या । काव्यकेसरी शाहिर महादेव शरणांगत आला । गंगाधर तूंचे विजय देई आज या हिंद रणा । हिंद पुत्र हे सिद्ध देशास्तव प्राण अर्पाया । स्मरुनि तुझ्या त्या पवित्र पादुका लढती हिंद रणा । राष्ट्र घेण्याला ॥ ६ ॥ हे जगद्वंद्य ॥

॥ श्रीराजारामचंद्रकी जय ॥

पोवाडा २

❀ स्वातंत्र्याचा विजय डंका ❀

(चाल - धन्य शिवाजी०)

॥ स्वातंत्र्याचा विजय रवी हा उदयाचलिं आला ॥
॥ विजयश्री ती माळा घाली गांधी जवाहिरा ॥
॥ स्वातंत्र्याचा तो रणगाजी लोकमान्य पहिला ॥
॥ स्मरुनि त्या वचनाला महात्मा मिळवि स्वातंत्र्याला ॥१॥ स्वा०
॥ नर-नारायण गांधि-जवाहिर जगुं हे अवतरले ॥
॥ देशकार्यी तन मन धन अर्पुनि समरीं विजयी झाले ॥२॥ स्वा०
॥ स्वातंत्र्याचा सुदिन घरोघर भारतिया आला ॥
॥ बंधमुक्त ते सकल हिंदविर होती या काला ॥३॥ स्वा०
॥ वल्लभभाई पटेलजींनीं अमर नाम केलें ॥
॥ समरीं ज्यांनीं ब्रिटिश अंमल सहजचि पळविले ॥४॥ स्वा०
॥ समरीं लढुनि वल्लभजी ते विजयि रणीं झाले ॥
॥ बारडोलि गुजराथ प्रांतिचे सरदार कि सजले ॥५॥ स्वा०
॥ भगतसिंग सुखदेव राजगुरु देशदिपक बनले ॥
॥ पाहुनि इंग्रज विजयि विरांना अंतरिं घाबरले ॥६॥ स्वा०
॥ सर्वप्रांतीं विर नरकेसरी अभ्यंकर झाले ॥
॥ समरीं ज्यांनीं ब्रिटिश कानू पायीं तुडवाले ॥७॥ स्वा०
॥ रणजना मध्यप्रांतीं कळनिया अमर नाम केलें ॥
॥ सकल जनांना वाटति दुसरे गांधी अवतरले ॥८॥ स्वा०
॥ सकल तया वीर शिरोमणि पुनमचंद रांका ॥
॥ म्हणती सकल जनांनीं आपुलें स्वहीत हा देखा ॥९॥ स्वा०
॥ स्वातंत्र्यास्तव भारति उघडा खादीच्या शाखा ॥
॥ खादी-अपुल्या स्वातंत्र्याची असे जीवनरेखा ॥१०॥ स्वा०
॥ पुनमचंदजीनिही राष्ट्राखातर देह की कष्टविला ॥
॥ जगदीशानी अखेर त्यांना सुदीन दाखविला ॥११॥ स्वा०

॥ जनरल आवारी मध्यप्रांतिचे सेनानायक बनले ॥
॥ समरीं ज्यांनीं शस्त्र घेवोनी प्रथमचि ते लढले ॥१२॥ स्वा०
॥ या क्रूरानें आवारीजिना बहुतचि छळियेलें ॥
॥ परंतु आवारीजींनीं नाहीं मस्तक नमविलें ॥१३॥ स्वा०
॥ सुभाषचंद्र आणि सेनगुप्त ही देशदिपक बनले ॥
॥ अखिल भारतीं ज्यांनीं आपुलें नाम अमर केलें ॥ १४ ॥ स्वा०
॥ बजाज मालवीजींनि आपुलें देशकार्य केलें ॥
॥ राष्ट्राखातर तनु झिजवोनी समरीं विजयी झाले ॥ १५ ॥ स्वा०
॥ रुईकरांनीं ही देशाखातर प्रयत्न बहु केले ॥
॥ राष्ट्रास्तव या अखिल जनांना उपदेश दिधले ॥ १६ ॥ स्वा०
॥ सकलातहीहो तैयबजी ते समधीर बनले ॥
॥ वय ब्यांशी वर्षांचें असुनिया कानु भंग केले ॥ १७ ॥ स्वा०
॥ फिरंग्याचा रंग दिसतसे अंगाना गोरा ॥
॥ स्वातंत्र्य विरांचा विजय पाहुनि अंतरीं भडके उबाळा ॥१८॥ स्वा०
॥ आंग्लज सत्ता म्हणे आतां हो चला युरोपाला ॥
॥ नाहिं तर हे समधीर बुडविल आपणांला ॥ १९ ॥ स्वा०
॥ हर हर शंभो स्वातंत्र्याचे विजयी विर केले ॥
॥ रक्षुनिया सकलांना आपुल्या स्वस्थाना आणिलें ॥ २० ॥ स्वा०
॥ काव्यकेसरी शाहिर महादेव शरणांगत आला ॥
॥ करुणाकर वरदायक सांब रक्षी हिंदजना ॥ २१ ॥ स्वा०
॥ तिरंगी झेंडा अमर ठेउनि यश द्यावें सकला ॥
॥ स्वातंत्र्यास्तव सकल विरांनीं देहकी कष्टविल्या ॥ २२ ॥ स्वा०
॥ स्वातंत्र्याचा अखिल भारति जयजयकार झाला ॥
॥ सकल मिळुनिया वंदूं आपण तिरंगी झेंड्याला ॥ २३ ॥ स्वा०
॥ अंबर तिरंगी झेंडा आपुला भारतीं फडफडला ॥
॥ विजयश्री ही माळा घाली सकलही हिंद विरा ॥ २४ ॥ स्वा०

॥ दोहरा ॥

॥ नमभाइयके सरकरभी चलन अपना स्वदेशीही ॥
॥ मजा मरने में आयेगर चलन अपना स्वदेशी हो ॥ १ ॥

पोवाडा २ रा.

	तिरंगी झेंडा फडफडला		फिरंगी जळे अंतराला	
	राष्ट्राचा या तो रंगोजी		लोकमान्य पहिला	
	स्मरुनि त्या वचनाशीं महात्मा || मिळवी स्वातंत्र्या || १	
हर हर गांधीजी बोला ||

	विजय तोरणा तुजसाठीं तो		नवरोजी गेला	
	सुमंगलध्वजा वा तुजसाठीं तो		लोकमान्य गेला	
	भारत जिवना तुजसाठीं वा		राष्ट्र–अधिपती मोतीलाल गेला	
हर हर गांधीजी बोला ||

	विमलध्वजा तव चिन्हांस्तव या		पंजाब केसरी लाला ही गेला	
	राष्ट्र तोरणा तुज साठीं तो		स्वातंत्र्य केसरी दास बाबु गेला	
	हिंद निशाणी साठीं || अरविंद घोषही गेला || ३	
हर हर गांधीजी बोला ||

	राष्ट्र जिवना तुजसाठीं हीं		बाबू गेनू गेला	
	देशदीपका तुजसाठीं या		यतिंद्रनाथ गेला	
	अखेर आपुल्या महात्माजिंनीं || विजय कळस फडकविला || ४	
हर हर गांधीजी बोला ||

|| शुद्ध खादिचा रंग करितसे || अंधकीं गोऱ्यांना ||
|| स्वातंत्र्यविरांच्या विजय ध्वजाचा || शुभ्र रंग पहिला || ५ ||
फिरंगी जळे अंतराला ||

|| रक्तवर्ण तो शोभवी अंबेच्या पवित्र नयनाला ||
वरदानी विश्व मोहिनि जगदुर्गा ||
|| साह्य झाली महात्म्यांना | नमविलें फिरंगी सेनेला || ६ ||
फिरंगी जळे अंतराला ||

|| हरा रंग हा शोभवीतो की मोहमदिनांना ||
|| महमद अलीही अखेर गेले || स्मरुनि या समराला || ७ ||
फिरंगी जळे अंतराला ||

|| वीर रसीं बालकांची सेना समरीं लढलीना ||
|| कोणि प्रहारी पडली हवाली झाले नाहिं स्वमनाला ||

॥ तुडविले ब्रिटिश कानूंना ॥ देवा रक्षी वीर बाळा ॥ ८ ॥
फिरंगी जळे अंतराला ॥
॥ हरला उपाय या वहुरांनी ॥ कपट जाळ रचिला ॥
॥ मशिनगन्स आणि गोळीबार तो देशोदेशी केला ॥
॥ कैसा कपटी हा कोल्हाऽऽदेऊं नका थारा हो याला ॥ ९ ॥
फिरंगी जळे अंतराला ॥
॥ स्वातंत्र्यास्तव सकल विरांनीं आत्मयज्ञ रचिला ॥
॥ गोळीप्रहार हो झेलुनी हृदयी ॥
॥ लढले ते समराला स्थापिलें राणें त्या झेंड्याला ॥ १० ॥
फिरंगी जळे अंतराला ॥
॥ आंग्लज जन हे म्हणति आतां हो चला युरोपाला ॥
॥ समरधिरांनीं लढुनि समरीं नमविलें कीं आपणांला ॥ ११ ॥
हर हर गांधीजी बोले ॥
॥ शाहिर महादेवें प्रेमें पोवाडा रचिला ॥
अखेर तिरंगी झेंडा आपुला भारतीं फडफडला ॥
॥ देवा रक्षी सकलांना ॥ १२ ॥ हर हर गांधीजी बोले ॥

भाग २ दुसरा समाप्त

—— :o: ——

(भाग ३ रा.)

॥ स्वातंत्र्याचा उदयरवी ॥

(पाळणा) चाल:—देशदैन्य हरे

॥ गुणी बाळ असा निजसी कां प्रभु नामा ॥ जाग जाग रे शिवराया ॥
([illegible] जागा झाला
॥ काळ रात्रिचा प्रहर खाला भारताला ॥ अजुनि कांहीं निजलें ॥
धांवत [illegible] आलो ॥ १ ॥ गुणी ॥

॥तुज पाहुनिया [illegible] किती [illegible] ॥ कधीं अवतार घेशील ॥
॥रणीं [illegible] [illegible] ॥ मराठ्यांचा विजय प्रभु केला ॥
॥ मग आलो [illegible] [illegible] ॥ [illegible] की सकल जन तुजला ॥२॥
॥ राष्ट्रावर [illegible] [illegible] क्रूर हा [illegible] ॥
॥ यानें बांधियलें तुजला निजला प्रजेला ॥ राखि [illegible] तूं या वेळा ॥ ३ ॥
[illegible] [illegible] स्वातंत्र्याचा उदय होईल ॥
॥ [illegible] रक्षण करिल ॥ असुरांचा सूड उगवील ॥
[illegible] हा [illegible] तुझ्या प्रभु प्रिय धेनू ॥ कधीं प्रगटेल साक्षा मानू ॥४॥

चाल. (तुझी [illegible] [illegible] निजसी कां प्रभु वायां)

॥ [illegible] काय कां प्रभु केलें ॥ आत्मा राष्ट्राचा नेला ॥
॥ [illegible] ॥ भारताचा अधिपती गेला ॥
॥ [illegible] शिवबांच्या मेलेला ॥ राष्ट्राचा नृप त्वां नेला ॥ १ ॥
॥ [illegible] ॥ तुडवि जो इंग्रजी सत्ता ॥
॥ [illegible] तो [illegible] ॥ स्वातंत्र्याचा दिपक मावळला ॥ २ ॥
॥ [illegible] ही पडतां ॥ मोतिलालजी ॥ [illegible]मळले नाहीं चित्त ॥
॥ [illegible] ते [illegible] जवाहिरा ॥ आवरि बाळा शोक तूं अपुला ॥३॥
॥ देशासाठी [illegible] गेला ॥ पुण्यात्मा स्वर्गी वसला ॥
॥ मग [illegible] तंतु एकचि उरला ॥ हा स्वदेश मिळवी आपुला ॥
॥ [illegible] सोडुनिया स्वर्गी आतां [illegible] ॥ जणुं महात्म्यांचा बाहु गेला ॥
॥ हिंद[illegible] मोडिले [illegible] ॥ ४ ॥ हरहर गौरीहरा ॥
॥ [illegible] बंधु भगिनींना ॥ आठवा जवाहिराना ॥
॥ [illegible] हा [illegible] या वेळीं ॥ [illegible] ते राष्ट्रकराग्र ॥
॥ [illegible] पुण्यात्मा या देशाला ॥ [illegible] स्वतंत्र हा आपुला ॥५॥
॥ [illegible] केला ॥ हा स्वदेश [illegible] ॥
॥ [illegible] ती [illegible] ॥ पुण्यात्मा स्वर्गी संचरला ॥
[illegible] ॥ ६ ॥ हर हर गौरीहरा काय कां प्रभु केला ॥

पद ८ (चाल— [illegible])

सुजन हो जरि, सवडी, हृदयीं धरी । मोठ्यांच्या चरणी ठेवा प्रीती
॥ जरि ॥ (महात्म्यांच्या)
स्वातंत्र्याची जरि या रीती । भगतसिंह शिकवुनि गेले निती ॥ १ ॥
देशास्तव देहाचर उदार होवो । सरदार भगतसिंह चक्रवर्ती ॥
राष्ट्रास्तव आचरनि क्रांती । हिंद मातेसी शिरकमल अर्पिती ॥ २ ॥ जरि ॥
आपुल्या हिंदू हिरा भगतसिंह नाहिं गेल्या । सुखनहो । राजगुरुही । नाहीं मावळला ॥
सुखदेव वदे सकलांना । पुनरपी येऊं आम्ही जगतीं । [illegible] तो
॥ ३ ॥ जरि ॥
भगतसिंह सुखदेव राजगुरु कैचे गेले । त्यांचे स्वातंत्र्याचे हेतु राहीले ॥
पुनरपी येऊनि जगतीं । फिरंग्यांचा बदला घेती ॥ ४ ॥ जरि ॥
विररत्न ते स्वर्गी म्हणती । कांहीं दिन पाळा हृदयीं शांती ॥
प्रेम ठेऊनि आपुल्या वरती । विजयी व्हावे समरीं या जगतीं ॥ ५ ॥ जरि ॥
काव्यकेसरी भगतसिंह सुखदेव राजगुरूनां । प्रेम पुष्पिती । [illegible] ॥
किती वर्णु त्यांची किर्ती । ते गेले नाहीं जगती स्वातंत्र्याचा सोपा केली ॥ ६ ॥ जरि ॥

दोहरा

भाइयो भगतसिंह सुखदेव राजगुरु । मजी मोत से छूटे नाहीं ॥
निरादरो जाना सबीको एक दिन है । मजी हमेंभी मोतकी दर्द नाहीं ॥

* * *

पद ९.

(चाल — धन बंधु सखा कुन्य जगी०)

॥ भक्तपालका मुरारि आतां धाव लौकरी ॥ येक फकीर जनीं आली ॥
॥ महात्मजीनी हा घातकी अरि वध करि लवरी ॥ [illegible] हरी श्री हरी ॥
भक्तपालका ॥ १ ॥
॥ भागवताचे सत्यपाल अभुलतिल या तरी ॥ [illegible] ॥
॥ पहातोचि संकटी राजेंद्र हांक ऐकली ॥ तोच येक ओळज आली ॥
भक्तपालका ॥ २ ॥

॥ शिक्षेस नसतां पात्र जनी ॥ राजगुरू असुरें घेतला वशी ॥
॥ ऐसी प्रभुहुनियां तारिलें ॥ प्रल्हादास राखि नरसिंहरूप धरुनि ॥
भक्तपालका ॥ ३ ॥

॥ प्रभुरे त्या सुवर्णभूमि माडी पाहिलें कीं ॥ सुख या जनीं ॥
॥ आचरुनि अघोर अत्याचार कापिलें रणीं ॥ असुरें कीं राहुनी ॥
भक्तपालका ॥ ४ ॥

॥ गोविंदा त्वांचि उद्धरले पांडव ते ॥ कौरवांचा नाश या करुनि ॥
॥ तैसीच वेळ आज आली ॥ सुवर्णभूमीवरी धांव धांव कंसारी ॥
भक्तपालका ॥ ५ ॥

॥ कृष्णकेसरी महादेव म्हणे ॥ भक्तपालका हरी राष्ट्रदुःख हे हरी ॥
॥ श्रीहरि त्वां निर्मिली विश्वीं हरि ॥ सृष्टि ही सारी ॥ पवन-प्राण जिवास
देविसी तूं ॥ भक्तपालका ॥ ६ ॥
॥ [illegible] आपुल्या करीं ॥ मेई निळ्या ह्या असुरां ॥ भक्तपालका ॥ ६ ॥
॥ जरी निर्मिली सृष्टी आपल्या विश्वांनी ॥ पसे श्रीहरींच्या हाति जीवन दोरी ॥
॥ हें जाणे कीं निश्चित कृष्णाविक सुजनीं ॥ सकलही चला पुजूं स्वमनें मुरारी ॥

* * * * * *

पद १० वें.

(चाल. परदळला पांश देवें ज्यांच्या गळां लागला.

स्वातंत्र्याचा भाग्यभानू उगवे उद्यां त्वकरी । राष्ट्रवीर पुढें झगडती ।
विजय समरिं जे मिळवीती । गांधी जवाहिर लढतां रणिं या पवित्र देशकार्यी ॥१॥
स्वातंत्र्याचा भाग्यभानू ॥ हिंद-केसरी आपुले गेले ॥ गंगाधर ते टिळक हि
झाले ॥ स्वतंत्र भारत [illegible] देशांना ॥ प्रथमाचे ज्यांनीं मंत्र स्थापिले ॥
भारते वंदेमातरम् ॥ २ ॥ देशाचा विजयभानू ॥ राष्ट्र अधिपती आपुले गेले ॥
मोतीलाल नेहरू झाले ॥ स्वदेह ज्यांनीं समरीं वाहिला ॥ स्वातंत्र्याच्या कार्यी ॥
॥ ३ ॥ देशाचा विजयभानू उगवे उद्यां त्वकरी ॥ स्वातंत्र्याचा पहा उगवले ॥
प्रकाश पडला हिंद भूमिवर ॥ चरखा ज्यांनीं प्रथम काढिला ॥ भारी सुदर्शन
हें मंजलें ॥ ४ ॥ देशाचा विजयभानू उगवे उद्यां त्वकरी ॥ नरसा आमुच्या

गरगर फिरतो ।। इंग्लंडशांना सहज नमविलो ।। इम्पज पाहुनि निष्ठुरहि मनीं जळतो ।। या सुदर्शना ।। ५ ।। देशाचा विजयभानू उगवे उषा लवकरी ।। ।। सकलांना वस्त्रे पुरविण्याला ।। कृष्ण महात्मा जणुं हा जनक ।। जागृती स्वप्नीं इंग्रजांना ।। भासे आमुचा काळ आला ।। महात्म्यांनी जिंकिले सहज सकला ।। ६ ।। देशाचा भाग्यभानू ।। काव्यकेसरी महादेव या ।। प्रेमें वंदितसे मोहनांला ।। देशास्तव जी कष्टा आपुल्या ।। देह तो रणीं महात्मा विजयी तारणी ।। ६ ।। स्वातंत्र्याचा भाग्यभानू उगवे उषा लवकरी ।।

पद चाल-(मम बंधुसखा शून्य झालें)

श्रीहरी हिंदचा हो दास्य बेडी । तोड तोड तोड । करि शेवट हा गोड ।।
परदास्यांतुनि मुक्त करुनि जनां । देई चरण पदीं ओढ ।। १ ।।
दास्यशृंखला ही तोड ।।

स्वतंत्र कधि होईल हिंद । बोल मसीं बोल श्रीरंगा ।। बोल बोल बोल ।।
असुरी ह्या आंग्लजसत्तेचा । विलय करुनि । देश मुक्त जोड ।।२।। दास्य बेडी०

कपटि केले त्या श्रीकृष्णा । बंदिवान करितां । देवकी वसुदेवें ।।
तरि प्रसवुनीया । कंसास वधुनी । वदविले त्यांचो कृष्ण कृष्ण ।। बोल ।।
केलासो शेवट हा गोड ।।३।। श्रीहरी हिंदाचे हो ।।

तैसाची कपटी कंसरूपी असुरी नृप हा जनांसी । त्रास देत घोर ।।
यांचा विलय करुनि । हिंदजनांचा मिटवि । घोर घोर ।। ४ ।। दास्य बेडी०

आणि महात्मा या देशास्तव । करिती प्रयत्न । थोर थोर ।।
स्वातंत्र्यराज तिलक । हिंद देवास । कधीं होईल बोले बोल ।।५।। दास्य बेडी०

काव्यकेसरी चरणि शरण । तुझ्या गोपाला । राष्ट्र उद्धरुनिया ।।
सकलांना देई । चरण पदीं ओढ ।। ६ दास्यशृंखला ही तोड ।।

पाळणा चाल-(जो जो जो जोरे सुकुमारी)

जो जो जो जो रे शिवराया । आलासी धर्म रक्षाया ।।
करि करुनिया स्वातंत्र्यदोरी । हालविते राजमाता जिजाई या ।।१।। जो जो०

भवानी मातेनी मज दिधला । शिव हा छत्रपती होईल या ॥
अवतार शंभूचा तूं राया । हरहर महादेवा या ॥ २ ॥ जो जो०
डंका नौबती त्या फडफडल्या । शिवनेरी किल्याला ॥
शिव ते जन्मले जगत्पालक या । राजमाता जिजाऊच्या उदरा या ॥३॥ जो०
पाळणा बांधियला सायासी । शौर्यशाली राजे शहाजींचा वंशी या ॥
सकलही महाराष्ट्रांचा आधार या । प्रभु महादेव शिवरूपें ।
अवतरले अवनिवर या ॥ ४ ॥ जो जो०
त्रिभुवनपालक ते चंद्रमौळी या । निघाल सकलांना रक्षाया ॥
स्वर्गीहि देवहि ते म्हणती या । प्रभु आतां रक्षिल निजधर्मा या ॥५॥ जो०
ह्या तुम्ही आलेत कीं । म उदरा या । देशाची लाज रक्षाया । पातक्यांचा वध
कीं कराया ॥
सकलही ज्ञानाचा सागर तूं या । त्रिभुवनपालक त्रिपुरारी या ॥ ६ ॥ जो०
स्वदेशें हाकविली कोटी मानुला या । शंभुच्याही शौर्याला ॥
शिव माझा शौर्य धैर्याचा रघुविर या ! जणुं हरिहर दुसरा या ॥७॥ जो जो०
येसाजी तानाजी बाजी तुम्ही या । साह्य करा कीं मग शिवराया ॥
सकलांनी साह्य करुनिया । शिवराया । रक्षिले कीं देशाया ॥ ८ ॥ जो जो०
काव्यकेसरी विनविती शिवराया । प्रभु घेई आतां अवतारा या ॥
आली घई जनीं किल्याला या । रक्षिला कीं प्रभुराया ॥ ९ ॥ जो जो०
प्रेमें गाईला पाळणा या । महादेव लोकीं शिवचरणीं या ॥
देवा राष्ट्रावर या आला घाला । प्रगटे स्वयंभु शिवा या वेळा या ॥१०॥ जो०

श्लोक

स्वदेश ज्यांनी आज रक्षियेला ॥ लढूनि प्रथम या समरांगणाला ॥
सद्गुरु रामदासें उपदेश दिधला ॥ स्वातंत्र्य मिळवी रणाला ॥ २ ॥ स्व० ॥
जयजय भवानी करुनि गजर या ॥ हरहर महादेव करुनि गजर या ॥
रणदुंदुभी वाजल्या रणाला ॥
वंदूनिया पादुकापदा श्रीसद्गुरुचे ॥ लढती लढूनि शिवबा विजयी जहाला ॥

पद चाल— (आनंदाचा कंद हरी०)

हिंदवीरांनो हा समेट फेका ॥ रणगर्जना समरीं करा ॥ (वेळ तोहि पुढें आला)
भगतसिंह सुखदेव राजगुरु देशकार्यी लढतांना ॥ टपली होती असुरी सत्ता ॥
घात यांचा रणीं करण्या ॥ १ ॥ हिंद० ॥
तहनाम्यांच्या अटी महात्म्यांनीं ॥ समरीं कबुल करतांना ॥
गमें असतां त्रैमूर्तींचा कैसा घेतला ॥ रणीं घाला ॥ २ ॥ हिंद० ॥
सोलापुरी ही या क्रूरांनी जुलुम घोर या आचरिला ॥
निरअपराध्यांनाही फांशी दिधला कैसी सांगा ना ॥ ३ ॥ हिंद० ॥
या सर्वांचा विचार करितां मन हें आपुलें फाटेना ॥
सकल जनांच्या हृदयीं खेळे भगतसिंह या वेळेला ॥
सकल जनांच्या हृदयीं खेळति सप्तचरण जीव या वेळां ॥ वीररत्न हो ॥
या समरधिरांचा खेद भरा या क्षात्र । असेल हृदयाला ॥
ईशाजवळ मागणी मागा पुनरपि घाली जन्माला ॥ ५ ॥
काव्य-केसरी शाहिर महादेव शरणांगत तुज गौरिहरा ॥
पुनरपि हिंद जनांचा भगतसिंह कधीं प्रगटेल या अवनीला ॥ ६ ॥ हिंद० ॥
वीरहो ॥ कांहीं दिन या पाळुनि शांति वचन महात्म्यांचें खरा ॥
गोलमेज परिषदेंत जरि यश मिळेल आपुल्या राष्ट्रांना ॥
(नाहीं तर या संग्रामाचा सुदिन तोही पुढें) ॥ ७ ॥ हिंदरत्नांनो० ॥

॥ पोवाडा ॥

चाल— भगवा झेंडा०

भगवा झेंडा फडकत आला ॥ महादेव बोला
॥ हरहर महादेव बोला ॥
सुरेल सनया शिंगे कर्णे ॥ पंचम स्वर धरिला ॥
डंका नौबति झडुनी राहिल्या ॥ नाद नभीं भरला ॥
हरहर महादेव बोला ॥ २ ॥

टप टप टापा उडुनि राहिल्या ॥ जीन साज चढला ॥
भाला बरची कमान तिरकस ॥ शिलेदार कुमकेला ॥
हरहर महादेव बोला ॥ ३ ॥

थय थय थय थय वारु नाचती ॥ जीन साज चढला ॥
जरि पटक्यांची तिनी अबादिस ॥ हत्ती खासा झुलला ॥
हरहर महादेव बोला ॥ २ ॥

मर्द गड्यांनी रक्त अर्पुनि ॥ झेंडा बनविला ॥
शिरावांचुनि धड लढवोनी ॥ मुरारबाजी पडला ॥
हरहर महादेव बोला ॥ ४ ॥

या झेंड्या तव जतनासाठीं ॥ तानाजी गेला ॥
तुटल्या हातावर वार झेलतां ॥ वैकुंठासी गेला ॥
हरहर महादेव बोला ॥ ५ ॥

छत्रपती श्रीशिवराय हा ॥ अवतारी झाला ॥
समर्थ गुरुंनी प्रसाद दिधला ॥ झेंडा रणीं झळकविला ॥
हरहर महादेव बोला ॥ १० ॥

मुद्रक:—गो. गो. गोखले साहित्य मुद्रणालय सीताबर्डी नागपूर.

प्रकाशक:—महादेव गोपाळ बोरसे चिंचणी तारापूर जि० ठाणे.